# ।। तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल ।।



रामचंद्र अर्जुन शिंदे
कारागिर 'ब'
नाशिक औ.वि. केंद्र

**वा**रकऱ्यांची पाऊले पंढरीच्या वाटेवर चालु लागतात. त्याच्या किती तरी आधीपासून या विठ्ठल भक्तांना पांडुरंगाचे वेड लागलेले असते. पांडुरंगाच्या नामात व हरीच्या गजरात या देवाच्या भक्तीत तल्लीन होऊन वारकरी पंढरीस जातात. हे भक्त गण भागवत धर्माचे अनुकरण करत विठ्ठल क्षेत्र विठ्ठल. एकच ध्यास भागवत मंडळीत असतो.

विठ्ठूच्या या लाडक्या भक्ताला कळसाचे दर्शन पाहिजे असते. तो कळसाचे दर्शन व विठूरायाची भेट घेतल्याशिवाय माघारी फिरणारच नाही. वारकरी या नगरीत एकमेकांना गळाभेट घेतात. एकमेकांच्या पाया पडतात. विचारांची देवाण-घेवाण करतात. पांडुरंग पाहाता ते माणसालाच देव मानतात. वैष्णव भक्तीत जातीभेद नाही. पांडुरंग सर्वांचा आहे असे समजतात.

या पांडुरंगाची भक्ती फार सोपी असून हा देव काही केले तरी कोपत नाही. आपल्या भक्तावर रागवत नाही. अश्या सोप्या देवाच्या गावातील आमच्या ग्रामीण भागातील टाळकरी, माळकरी आपली शेती, पांडुरंगाच्या भरवश्यावर सोडून पंढरीची वाट चालु लागतात. तरीही प्रिय विठू त्यांच्या शेताची साक्षात राखण करतो. मग हे गावांकडील ग्रामीण जीवन काय असतं त्याचा अनुभव हा वारीतच येतो. स्त्रिया आपल्या लाडक्या विठूला व केलेला नवस फेडण्यासाठी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन वारीत चालू लागतात.

लाखोच्या संख्येने शहरी व ग्रामीण वारकरी पंढरीची वाट चालू लागतात. एवढ्या मोठ्या संख्येने वारकऱ्यांना खेचणारी कोणती भक्ती आहे, कोणती शक्ती आहे, कोण प्रेरणा देतो? सर्व धर्माचे भक्त तर उच्च शिक्षित असे मंत्रीगण, डॉक्टर, वकील, इंजिनियर, मास्तर, शेतकरी, सामाजिक कार्येकर्ते त्यात कोणीही मागे नाही. "जय जय राम कृष्ण हरी" ज्ञानोबा तुकाराम म्हणत. संताचे अभंगवाणी गात. महाराष्ट्राच्या दऱ्या-खोऱ्यातुन तर येतातच, पण देश, विदेशाची मंडळी या वारीत सामील होतात.

हा सर्व विठ्ठल भक्तीचा सागर. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल म्हणून वारीत सामील होऊन, एकच ध्यास पांडुरंगाच्या दर्शनचा. हरि मुखे म्हणत पायी पायी पंढरी नगरीत येतात. आधी रिंगण सोहळा, हा फार मोठा सोहळा असुन डोळ्याचे पारणे फिटते. अशा विठ्ठल भक्ताचे घरी हीच प्रथा असे चांगले विचार आपल्या घरावर पडावे. आपली मुले मुली विठ्ठल भक्तीच्या मार्गाने जावेत म्हणून वारकरी संप्रदाय आपल्या मुलांना विठ्ठल भक्तीची शिकवण देतात.

तुळशी माळा गळ्यात घातल्यास माणसाचे मन प्रसन्न राहते. त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे परमेश्वर विष्णू (विठ्ठल) देवाची पत्नी लक्ष्मी देवी तिचा अवतार म्हणजे तुळशी या माळेत १०८ मणी असतात. तर हा विठ्ठल भक्त उपासनेचे साधन म्हणून बुक्का वापरतात व घरात हरीभक्तीचे धडे देतात. मग या छोट्या भक्तांचे मन विठ्ठल दर्शनाकडे लागते.

तर हे भक्त ज्ञानेश्वरीच्या ओव्या वाचून हरीपाठाचे अभंग गातात, असे करता पंढरीच्या वाटेवर या मंडळीच्या या भक्ताचे मन वारकरी वारीकडे वळते व तो वारीत सामील होतो. हा वारकरी पांडुरंगाकडे एकच मागणे मागतो. विठ्ठला, मला काही नको रे, मला कसलीच आशा नाही पण पांडुरंगा मी जसा तुझ्या भेटीला आलो व तुझी भेट झाली, तशी भेट तसाच विठ्ठल तू रोज मला भेट हेच मागणे आता !

हेचि दान देगा देवा तुझा विसर न व्हावा।
म्हणणारे तुकोबा याहुन वेगळं काय सांगणार
पंढरीचा वास चंद्रभागेचे स्नान।
हा रामचंद्र म्हणे तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल।।

आणि दर्शन विठ्ठलाचे जन्मभर सेवा तुझ्या पावलांची माऊलीच मुर्ती विठ्ठलाची. अशा पंढरी नगरीत पुंडलीकाच्या भेटी साठी पांडुरंग आले या पावन, पवित नगरी वारीच्या रुपाने विठ्ठलाच्या माऊलीच्या दर्शनाला आलो. माझे जीवन धन्य झाले !